कृषी उन्नती योजनेअंतर्गत राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियानांतर्गत सन २०१७ - १८ मध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ₹ ८६.८७ लाख निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः रागते-१२१७/ प्र.क्र.१०/भाग-२/४अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: १२ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा :-</u>

१) केंद्र शासनाचे अभियाना संदर्भात http://agricoop.nic.in/dacdiviion/dacdiviion/NMOOP२०१४.pdf या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या मार्गदर्शक सूचना
२) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.०३१७/प्र .क्र./ १८ राकृवियो कक्ष, दि.१३/०४/२०१७
३) केंद्र शासनाचे पत्र क्र.६-१३/२०१७-AAP (coord)/OS,दि.२७ एप्रिल, २०१७
४) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.रागते-१२१६/प्र.क्र.१३२/४-अे, दि.१२/०५/२०१७
५) केंद्रीय कृषी मंत्रालयाचे पत्र-१४-१/२०१७-CA-II, दिनांक २९ मे, २०१७
६) शासन निर्णय कृ. रागते-१२१७/प्र.क्र.१०४/४अे, दि. १७ जून, २०१७.
७) केंद्र शासनाचे पत्र क्र. ६-१३/२०१७-AAP (coord)/ OS, दि. २० जुन, २०१७.
८) केंद्र शासनाचे पत्र कृ.२-१४/२०१७-एमएम-I (ओएस), दि.१० जुलै, २०१७.
९) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. बियुडी-२०१७/प्र.क्र.११/कार्यासन-६, दि. ४ जुलै, २०१७
१०) कृषी आयुक्तालय यांचे पत्र कृ. विप्र-२/रागतेअ.१७-१८/प्र.मा.प्रस्ताव/ कृ.आ.प्र.क्र.२ / २१६ /१७, दि.१२ जुलै, २०१७.
११) शासन निर्णय कृ. रागते-१२१७/प्र.क्र.१०४/४अे, दि. ०३ ऑगस्ट, २०१७.
१२) केंद्रीय कृषी मंत्रालयाचे पत्र-२०१७/१-१४-CA-II, दिनांक १६ नोव्हेंबर ,२०१७
१३) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.वि.प्र.२/रा.ग.ते.अ.१७-१८/वि.मा.दु.हप्ता/अनु.वा/ प्र.क्र.१०/३१२/१७, दि.२२ नोव्हेंबर, २०१७.
१४) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. बियुडी-२०१७/प्र.क्र.११/कार्यासन-६, दि. ०५ फेब्रुवारी, २०१८

<u>प्रस्तावना-</u>

केंद्र पुरस्कृत एकात्मिक गळीत धान्य,कडधान्य, तेलताड व मका विकास कार्यक्रम राज्यात सन २०१३-१४ पर्यंत राबविण्यात येत होता. केंद्र शासनाने बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सर्व केंद्र पुरस्कृत योजनांची पुनर्रचना केली आहे. त्यानुसार सन २०१४-१५ पासून केंद्र पुरस्कृत एकात्मिक गळीतधान्य, कडधान्य, तेलताड व मका विकास (ISOPOM) कार्यक्रमाऐवजी राष्ट्रीय तेलबिया व तेलताड (National Mission on Oilseed and Oil Palm (NMOOP)) या अभियानाची सुरुवात केली आहे. सदर अभियानाअंतर्गत लघुअभियान- १ (तेलबिया), लघुअभियान-२ (तेलताड) व लघुअभियान-३ (वृक्षआधारित तेलबिया) या तीन लघुअभियानांचा समावेश आहे. या अभियानाच्या निधीत, सन २०१४-१५ या वर्षात केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रमाण ७५:२५ असे होते. सन २०१५-१६ पासून केंद्र शासनाने केंद्र व राज्य हिश्श्याच्या प्रमाणात ६०: ४० अशी सुधारणा केली आहे.

केंद्र शासनाने संदर्भाधीन अ.क्र. ५ येथील दि. २९ मे, २०१७ च्या पत्रान्वये पहिल्या हप्त्यापोटी रु.२१३२.०० लाख एवढा निधी वितरीत केला होता. यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी रु.२१७.६७लाख (लघुअभियान- १ रु.२१४.९१० लाख + लघुअभियान-३ रु.२.७६० लाख) एवढ्या रकमेचा व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी रु.१८९.५५० लाख (लघुअभियान- १ रु.१८७.१४० लाख + लघुअभियान-३ रु.२.४१०लाख) एवढ्या रकमेचा समावेश आहे. सदर निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

केंद्र हिश्श्याच्या पहिल्या हप्त्यापोटी मुक्त केलेल्या **₹**४०७.२२ लाख एवढया रकमेस संदर्भ क्र.११ येथील दि.०३ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

केंद्र शासनाने अनुसूचित जमाती प्रवर्गाकरीता अभियानांतर्गत लघुअभियान क्र.१ करीता दुस-या हप्त्यापोटी केंद्र हिस्याचा ₹५२.१२२ लाख निधी वितरीत केलेला आहे व त्या समरुप राज्य हिस्याचा ₹३४.७४८ लाख असा एकूण ₹८६.८७ लाख निधी वितरीत करण्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे -

<u>शासन निर्णय-</u>

केंद्र पुरस्कृत कृषी उन्नती योजनेअंतर्गत राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियान (National Mission on Oil seeds and Oil Palm) सन २०१७-१८ या वर्षात राज्यात अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राबविण्यासाठी केंद्र हिश्श्याचा व राज्य हिश्श्याचा मिळून एकूण **रु.८६.८७ लाख (अक्षरी: ₹ शहाऐंशी लाख सत्याऐंशी हजार फक्त)** एवढा निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर निधीपैकी केंद्र व राज्य हिस्साच्या निधीच विवरण पुढीलप्रमाणे-

(₹ लाख)

अ. क्र.	राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियान	अनुसूचित जमाती प्रवर्ग		एकूण
		केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	
१	उपअभियान-१ (तेलबिया)	५२.१२२	३४.७४८	८६.८७

२. परि.क्र.१ नुसार राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियानाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीपैकी केंद्र हिस्याचा **₹५२.१२२ लाख निधी (रुपये बावन्न लाख बारा हजार दोनशे फक्त)** आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पीत वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येत असून सदर निधी खालील लेखाशिर्षांतर्गत सन २०१७-१८ करिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा.

मागणी क्रमांक डी-५
२४०१- पीक संवर्धन
७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना
(०१) (१४) कृषी उन्नती योजना -राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियान
लघुअभियान-१ (तेलबिया (कें.पु.यो)
(केंद्र हिस्सा ६०%) (आक्षेउयो)
(२४०१A४८६)

३. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेल्या केंद्र हिश्याच्या (६० टक्के) निधीस अनुरूप राज्य हिस्याचा (४० टक्के) निधीस जिल्हा नियोजन व विकास समितीच्या (DPDC) अखत्यारीतील तरतूदीस

संबधीत जिल्हाधिकारी यांचेकडून वित्तीय मान्यता देण्यात यावी. सदर राज्य हिश्याचा आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय विभागाच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या लेखाशिर्षांखाली (डि.पी.डी.सी.) जिल्हास्तरावर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागवण्यात यावा.

४. सदर निधी खर्च करताना संदर्भाधीन अ.क्र.३ येथील दि. १२ मे, २०१७ च्या शासन निर्णयातील अटी, शर्ती व कार्यपद्धतीचे पालन करण्यात यावे.

५. सदर निधी सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखड्यानुसार याच वर्षात खर्च होईल, याची दक्षता घ्यावी.

६. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी उपलब्ध करुन दिलेला निधी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या लाभार्थ्यांकरीता व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी उपलब्ध करुन दिलेला निधी प्रवर्गासाठी खर्च होईल, याची दक्षता घ्यावी.

७. सदर शासन निर्णय आदिवासी विकास विभागाच्या दि.०३ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णयाच्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे .

८. सदर शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३ दि. १८ एप्रिल, २०१७ च्या शासन परिपत्रकातील अटींच्या पालनेच्या अधीन राहून व वित्त विभागाचे परीपत्रक अर्थसं - २०१७/प्र.क्र.९४/ अर्थ -३, दि. ३० जून, २०१७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१२१२४९५५७९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.02.12 12:57:33 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
३. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे
४. सहसंचालक (नियोजन), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१
५. जिल्हाधिकारी, (सर्व)
६. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
७. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
८. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, शास्त्रीनगर, अकोला.

१०. सहसंचालक लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, पाचवा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ /२, मुंबई / नागपूर
१२. महालेखाकार(स्थानीय निकाय लेखापरिक्षा व लेखा), प्रतिष्ठा भवन,१०१ महर्षी कर्वे मार्ग, मुंबई-४०० ०२०
१३. नियोजन विभाग (कार्यासन - १४३१ / कार्यासन - १४४४), मंत्रालय, मुंबई - ३२
१४. वित्त विभाग (व्यय-१) /अर्थसंकल्प -१३
१५. सामाजिक न्याय, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग / आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१६. ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई
१७. सर्व सहसचिव /उपसचिव / अवर सचिव/ कक्ष अधिकारी (फक्त कृषी), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१८. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
१९. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
२०. निवडनस्ती (कार्यासन-४अे), कृषी व पदुम विभाग.